# प्रकरण ४ थे.

## दि बॉम्बे प्रायमरी एज्युकेशन ॲक्ट ऑफ १९४७

## (शासन, नगरपालिका व शाळा-मंडळ यांचे परस्पर संबंध)

४.१. इ.स.१९४७ च्या पूर्वी अस्तित्वात असलेली प्राथमिक शिक्षणाची कायदेशीर व्यवस्था.

अ) इ.स.१८५४ पासून इ.स.१९२२ पर्यन्त.

ब) इ.स.१९२२ ते १९२८.

क) इ.स.१९२८ ते १९४७.

४.२. दि बॉम्बे प्रायमरी एज्युकेशन ॲक्ट १९४७.

४.३. प्राधिकृत नगरपालिकांची प्राथमिक शिक्षणाविषयीची कर्तव्ये

४.४. नगरपालिका शाळामंडळ

अ) रचना

ब) कामे

४.५. सरकार व स्थानिक नियंत्रक संस्था

४.६. नगरपालिका व शाळामंडळ - अधिकार

## प्रकरण ४ थे.

### दि बॉम्बे प्रायमरी एज्युकेशन ॲक्ट ऑफ १९४७
### (शासन, नगरपालिका व शाळामंडळ यांचे परस्पर संबंध)

मागील प्रकरणात संशोधकाने संशोधनासाठी लागणाऱ्या साधनांची निर्मिती व त्यांचा उपयोग करून माहिती कशी मिळविली याबद्दलचे विवरण केले आहे. या प्रकरणात नगरपालिकांवर सोपविलेली प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी नगरपालिकांना पार पाडता यावी म्हणून जी कायदेशीर व्यवस्था केलेली आहे त्याची माहिती दिली आहे. यासंबंधात जे कायदे करण्यात आलेले होते त्यांचा आढावा घेऊन 'दि बॉम्बे प्रायमरी एज्युकेशन ॲक्ट १९४७' या कायद्यानुसार सरकार, नगरपालिका व शाळामंडळे यांचे परस्पर संबंधावर प्रकाश टाकावयाचा आहे.

### ४.१. इ.स.१९४७ च्या पूर्वी अस्तित्वात असलेली प्राथमिक शिक्षणाची कायदेशीर व्यवस्था:

इंग्रजी राजवट सुरू झाल्यापासून इ.स.१८५४ ते १९४७ पर्यन्तच्या काळात प्राथमिक शिक्षणाबद्दलच्या कायदेशीर व्यवस्थेत तीन प्रमुख टप्पे पडतात.-

(अ) इ.स. १८५४ ते इ.स. १९२३,

(ब) इ.स. १९२३ ते इ.स. १९३८,

(क) इ.स. १९३८ ते इ.स. १९४७.

(अ) <u>इ.स. १८५४ ते इ.स.१९२३</u>: या काळात भारत सरकारने निरनिराळी परिपत्रके काढून, परिषदा भरवून व समित्या नेमून देशातील शिक्षणातील प्रशासनात एकसूत्रीपणा आणण्याचा प्रयत्न केला. हे काम करणारे सर्व अधिकारी इंग्रजच होते. तरीपण त्यांच्या उदारमतवादी स्वभावामुळे व देशातील वाढत्या

चळवळीमुळे प्राथमिक शिक्षण स्थानिक संस्थांकडे सोपविण्याच्या कामाला चालना मिळाली.[१] प्राथमिक शिक्षणाच्या खर्चासाठी स्वतंत्र निधी ठेवण्यात येवू लागला.[२] नगरपालिकांनी केलेल्या खर्चावर अनुदान मिळू लागले.[३] नगरपालिका प्राथमिक शिक्षणावर खर्च करू लागल्या. इ.स.१८७० मध्ये मुंबई प्रांतात प्राथमिक शिक्षणावर झालेल्या एकूण खर्चात नगरपालिकांच्या खर्चाचा वाटा १.७ टक्के होता. तो इ.स.१९०१ मध्ये ५.७ टक्क्यापर्यन्त वाढला.[४] सरकारने स्थानिक संस्थांना बरेच अधिकार दिले होते. पण स्थानिक संस्थांना आपल्या अधिकाराचा वापर करता आला नाही. स्थानिक संस्थांनी काही अधिकार शिक्षण खात्याला दिले.[५]

इ.स.१८८२ च्या हंटर कमिशनने सुचविल्याप्रमाणे प्राथमिक शिक्षण नगरपालिकांकडे सोपविण्यासाठी इ.स.१८८४ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेबद्दलचा कायदा पास करण्यात आला. शिक्षणासाठी स्वतंत्र स्थानिक संस्था निर्माण करण्याचे व त्याविषयी शिक्षण खात्याशी चर्चा करून नियम करण्याचे अधिकार सरकारला मिळाले.[६] त्याप्रमाणे सरकारने अधिकार वापरून, इ.स.१९०१ मध्ये 'दि बॉम्बे डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल ॲक्ट' पास केला व त्यातील ५८ व्या कलमानुसार प्राथमिक शिक्षणाचे प्रशासन करण्यात येऊ लागले.[७] नवीन व्यवस्थेमुळे प्राथमिक शिक्षणात प्रगती झाली. इ.स.१८८५ मध्ये शाळांची संख्या २११ होती ती इ.स. १९२२ मध्ये १२,६२२ पर्यन्त गेली.[८] या व्यवस्थेनुसार शाळांचे अंदाजपत्रक संमत करण्याचे अधिकार नगरपालिकांना मिळाले. शिक्षकांची नियुक्ती, बदली याबाबत नगरपालिकांचा सल्ला घेतला जाऊ लागला. प्राथमिक शाळांची तपासणी करण्याचा अधिकार मात्र सरकारने स्वतःकडे ठेवला.[९]

(ब) इ.स. १९२२ ते इ.स. १९३८ :

या कालखंडात नामदार गो.कृ.गोखले प्रभृतींनी प्राथमिक शिक्षणाची मोहीम जोरात चालविली होती. त्याचवेळी देशाच्या राज्यकारभाराच्या

पध्दतीत महत्वाचा बदल होऊन द्विदल राज्यपध्दती सुरु झाली होती. प्रांतिक सरकारांच्या ताब्यात शिक्षण विषय आला. लगेचच मुंबई प्रांताने इ.स.१९२३ मध्ये "दि प्रायमरी एज्युकेशन अॅक्ट ऑफ १९२३" हा कायदा पास केला. या कायद्यान्वये प्रांतातील नगरपालिकांचे दोन वर्ग करण्यात आले. ते वर्ग अधिकृत नगरपालिका व अनधिकृत नगरपालिका असे होते. या कायद्यान्वये अधिकृत नगरपालिकांची संख्या ७० झाली.[१०] अधिकृत नगरपालिकेने आपल्या हद्दीतील मुलांचे प्राथमिक शिक्षण करावे व अनधिकृत नगरपालिकांच्या हद्दीतील शिक्षण जिल्हा स्थानिक संस्थांकडे सोपवावे अशी व्यवस्था केली गेली. नगरपालिकांतून शाळामंडळे (स्कूल बोर्ड्स) सुरु करण्यात आली. शाळामंडळातील सभासद निवडून आलेले असत. सरकारकडे सर्वसाधारण नियंत्रणाबरोबरच वेतन, अभ्यासक्रम, हिशेब तपासणी हे अधिकार ठेवण्यात आले व इतर अधिकार शाळामंडळांकडे सुपूर्द केले गेले.[११] त्यामुळे शिक्षणखात्याचे अधिकार कमी होऊन स्थानिक संस्थांचे अधिकार वाढले.[१२]

या कायद्याच्या अंमलबजावणीचा परिणाम चांगला झाला नाही. शाळामंडळांकडे जास्त अधिकार गेल्यामुळे प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनकार्यात बजबजपुरी माजली. शाळामंडळात कामे करायला योग्य माणसे मिळेनाशी झाली. आर्थिक मंदीमुळे शाळामंडळाना अनुदानही कमी मिळू लागले. प्रशासन यंत्रणा अकार्यक्षम ठरली.[१३] त्यामुळे स्थानिक संस्थांचे अधिकार मर्यादित करावेत असे सर्वांना वाटू लागले. याच काळात नेमलेल्या हरटॉग कमिटीने असे सांगितले की, स्थानिक संस्थांना दिले गेलेले अधिकार कमी करावेत. भारत सरकारने नेमलेल्या सेंट्रल बोर्ड ऑफ एज्युकेशन या समितीनेही वरीलप्रमाणे सूचना केली.[१४] याचा परिणाम म्हणून कायद्यांत दुरुस्ती करण्याचे ठरले व त्याप्रमाणे इ.स.१९२८ ला नवा दुरुस्त कायदा पास करण्यात आला.

(क) इ.सन १९२८ ते इ.स.१९४७ : 'दि बॉम्बे प्रायमरी एज्युकेशन (अमेंडमेंट) ॲक्ट १९२८' चा कायदा पास झाला. त्यांत पूर्वीच्या कायद्यामुळे निर्माण झालेले प्रशासनात्मक प्रश्न सोडविण्यावर भर दिला गेला. अधिकृत नगरपालिकांची संख्या कमी करण्यात आली. ती १९ वर आली.[15] शाळामंडळावर निवडून येणाऱ्या सभासदांसाठी पात्रता ठरविण्यात आली. प्रशासनाधिकारी सरकारी नोकर बनला. शाळा तपासणीचे अधिकार सरकारकडे आले. शाळामंडळाचे बरेचसे अधिकार कमी झाले. अनुदानाच्या पध्दतीत कोणताच बदल करण्यात आला नव्हता. पण वेळोवेळी ठराव करून सरकार पैसा उपलब्ध करून देऊ लागले. इ.स.१९२८ पासून नवीन निघालेल्या शाळांना सरकारतर्फे अनुदान मिळू लागले. इ.स.१९२८ पूर्वी नगरपालिकेच्या हद्दीत असणाऱ्या शाळांना नगरपालिकेतर्फे अनुदान मिळत असे. सरकारच्या या नवीन भूमिकेमुळे अनुदानाच्या रकमेत फरक पडू लागला.[16] प्रशासनाधिकाऱ्याच्या बाबत अन्याय झाला. त्याला सरकारची व शाळामंडळाची अशी दुहेरी ताबेदारी स्वीकारावी लागली. या कारणांमुळे कायदा बदलण्याची पुन्हा मागणी होऊ लागली. इ.स.१९४५ मध्ये कॉंग्रेस सरकार अधिकारारूढ झाले व कायदा बदलण्याची संधी मिळाली.

वरील कायद्यामुळे सरकारी नोकर व लोकप्रतिनिधी या दोघांचेही समाधान झाले नाही. म्हणून कायद्यात आमूलाग्र बदल करावा असे सर्वांना वाटू लागले. पण नवा बदल कोणत्या तत्वावर अधिष्टीत असावा याचा निर्णय करणे कठीण जाऊ लागले. कारण स्थानिक संस्थांचा पुरस्कार करणारा एक पक्ष होता तर स्थानिक संस्थांकडे अधिकार देऊ नयेत असे प्रतिपादन करणारा दुसरा पक्ष होता. यावेळपर्यन्त परिस्थिती खूपच बदलली होती. इ.सन १९४६ पर्यन्त प्रशिक्षित प्राथमिक शिक्षकाचा पगार रु.६०/- होता. नंतर तो रु.७०/- झाला.[17] शिक्षणाचा दरडोई खर्च इ.स.१९२६ मध्ये रु.१५/- होता तो इ.सन १९४६ मध्ये रु.२७/- झाला.[18] शिक्षणाच्या खर्चात स्थानिक वाटा कमी होऊ लागला व सरकारी खर्च वाढू लागला.[19] पुढील तक्त्यावरून स्थानिक संस्थांचा खर्चाचा वाटा कसा कमी होत गेला हे समजून येईल.

२-४, ६-३५, ९९, १५.

Kishori



तक्ता क्र. ४.१

मुंबई प्रांतात प्राथमिक शिक्षणावर होणा-या खर्चातील सरकारी व स्थानिक संस्थांचा वाटा

| क्र. | वर्ष | खर्च (शेकडा प्रमाण) | | | इतर |
|---|---|---|---|---|---|
| | | सरकार | स्थानिक संस्था | | |
| | | | ग्रामीण | नागरी | |
| १. | १९३६-३७ | ५५.१ | ७.१ | २५.४ | इतर खर्च |
| २. | १९४१-४२ | ५८.७ | ५.२ | २४.७ | फी व |
| ३. | १९४६-४७ | ६१.२ | ४.५ | २२.३ | देणगी यातून |

४.२. दि बॉम्बे प्रायमरी एज्युकेशन अॅक्ट १९४७

इ.सन १९४७ साली देश स्वतंत्र झाला. देशात सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचे धोरण स्वीकारले गेले. त्यावेळी 'दि बॉम्बे प्रायमरी एज्युकेशन अॅक्ट हा कायदा पास करण्यात आला. या कायद्यात एकूण ११ प्रकरणे असून सर्व मिळून ६७ कलमे आहेत. सर्व प्रकरणातून सरकार, नगरपालिका व शाळामंडळ यांचे परस्पर संबंध स्पष्ट केलेले आहेत. कायद्यातील काही महत्वाच्या तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत.

या कायद्याने नगरपालिकांचे अधिकृत नगरपालिका, व अनधिकृत नगरपालिका असे पूर्वी पाडलेले दोन प्रकार कायम केले पण प्राधिकृत नगरपालिकांची संख्या १४ वर आणली.[२८]

प्राधिकृत नगरपालिकांना स्थानिक नियंत्रकाचा दर्जा दिला व त्यांना स्कूल बोर्ड स्थापन करून आपल्या विभागातील प्राथमिक शिक्षणाची सोय करण्याची व

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

व्यवस्था पाहण्याची मुभा देण्यात आली. शाळामंडळातील निवडून येणाऱ्या सभासदांची संख्या, सरकारी प्रतिनिधींची संख्या निश्चित झाली व त्याचप्रमाणे सभासदांची निवडून येण्याची पात्रता ठरली गेली.[२१]

शाळामंडळाचा प्रशासनाधिकारी सरकारकडून नेमण्यांत येवू लागला.[२२] प्रशासनाधिकाऱ्याला आवश्यक वाटणारा नोकरवर्ग पुरविण्याची जबाबदारी प्राधिकृत नगरपालिकांवर सोपविण्यात आली.[२३]

नोकरवर्गाचे निवडीसाठी कर्मचारी निवड समिती अस्तित्वात आली.[२४] न्यायाधिकरणाची सोय केली.[२५] शाळा तपासणीचे अधिकार सरकारने आपल्याकडे ठेवले.[२६]

या कायद्यान्वये प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनाची जबाबदारी स्थानिक नियंत्रक संस्थेवर पडली.

४.२. <u>प्राधिकृत नगरपालिकांची प्राथमिक शिक्षणाविषयीची कर्तव्ये</u> :

दि बॉम्बे प्रायमरी एज्युकेशन ॲक्ट (१९४७) प्रमाणे प्राधिकृत नगरपालिकांनी आपल्या हद्दीतील प्राथमिक शिक्षणाविषयीची पुढील कर्तव्ये पार पाडावयाची आहेत. (कंसातील आकडे दि बॉम्बे प्रायमरी एज्युकेशन ॲक्ट १९४७ च्या कलमांचे आहेत.)

(१) विद्यमान प्राथमिक शाळा चालू ठेवणे. जरूर असेल तेथे नवीन प्राथमिक शाळा उघडणे. शासनाने, शाळामंडळाने किंवा नगरपालिकेने चालविलेल्या प्राथमिक शाळांव्यतिरिक्त इतर मान्य शाळांना अनुदान देण्याची व्यवस्था करणे. (१७.१अ)

(२) प्राथमिक शाळासाठी पुरेशी जागा, इमारती व साधनसामग्री उपलब्ध करून देणे (१७.१ ब)

(३) राज्यसरकारच्या मते आवश्यक असलेला कर्मचारीवर्ग नेमणे (१७.१क).

(४) सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना लागू करून मोफत प्राथमिक शिक्षणाची सोय करणे (१७.१ड).

(५) शाळामंडळाने सादर केलेला अर्थसंकल्प फेरफार करून अथवा फेरफार न करता मंजूर करणे (१७.१ई).

(६) प्राथमिक शाळेत जाणाऱ्या मुलांच्या कल्याणासाठी योजना करणे (१७.२).

(७) राज्यसरकारच्या मंजुरीच्या आधीन राहून पुढील बाबी करणे.-

अ) सहाय्यक प्रशासनाधिकारी व इतर नोकरवर्गासाठी अर्हता, वेतन व सेवेच्या अटी ठरविणे.

ब) प्राथमिक शाळांचा कारभार, व्यवस्था व नियंत्रण यांचे नियमन करणे.

क) प्राथमिक शिक्षण घेत असलेल्या मुलांना पुस्तके, पाटया, शिक्षणासाठी लागणाऱ्या वस्तू, दूध, जेवण, कपडे यांचा पुरवठा करण्याची तरतूद केली असल्यास तसा पुरवठा करणे.(१७.२).

या वरील तरतुदींचा विचार करता असे लक्षांत येते कीं, नगरपालिकांना प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनासाठी आवश्यक असलेल्या सर्व सोयी उपलब्ध करून देऊन प्रशासनाची सर्व जबाबदारी त्यांच्यावर टाकली आहे.

## ४.४. नगरपालिका शाळामंडळ :

दि बॉम्बे प्रायमरी एज्युकेशन ॲक्टप्रमाणे नगरपालिका शाळामंडळाची रचना व कार्ये पुढीलप्रमाणे आहेत. (कंसातील आकडे दि बॉम्बे प्रायमरी एज्युकेशन ॲक्ट १९४७ च्या कलमांचे आहेत.)

अ) रचना :- प्राधिकृत नगरपालिकेच्या प्रत्येक क्षेत्रासाठी एक नगरपालिका शाळामंडळ असते. त्या मंडळात १२ ते १६ समासद असतात. त्यापैकी दोन किंवा

जास्तीत जास्त तीन सभासद सरकार नियुक्त असतात. उरलेले सर्व सभासद नगरपालिकेने निवडून दिलेले असतात. प्राधिकृत नगरपालिकेची मुदत संपल्यावर शाळामंडळाची मुदत संपते; पण प्राधिकृत नगरपालिका बरखास्त झाली असेल तर व त्याचवेळी शाळामंडळाच्या सदस्यांची मुदत संपत आली असेल तर प्राधिकृत नगरपालिका पुन्हा प्रस्थापित होईपर्यन्त व नवीन शाळामंडळाची रचना होईपर्यन्त आधीचेच शाळामंडळ कार्यरत राहते. (४.९). प्रत्येक शाळामंडळ, मंडळाच्या सभासदांमधून सभापती व उपसभापती यांची निवड करते (४.१२). शाळामंडळाच्या सभापतीला राजिनामा द्यावयाचा असेल तर तो नगरपालिकेच्या अध्यक्षाकडे द्यावा लागतो (४.१२ब). शाळामंडळाच्या एखाद्या सभासदाने गैरवर्तन केले तर त्यास प्राधिकृत नगरपालिकेने केलेल्या ठरावानुसार काढून टाकता येते (४.९).

ब) कामे :- नगरपालिका शाळामंडळाला पुढील कामे करावी लागतात.-

(१) राज्यशासनाने चालविलेल्या शाळांव्यतिरिक्त प्राधिकृत नगरपालिकेने चालविलेल्या सर्व प्राथमिक शाळांच्या व इतर मान्य प्राथमिक शाळांच्या व्यवस्थेबद्दल व नियंत्रणाबद्दल जबाबदारी स्वीकारणे (१८.१).

(२) प्राथमिक शिक्षणाच्या वाढीसाठी प्राधिकृत नगरपालिकेने राज्य शासनाला सादर करावयाच्या योजना तयार करणे व योजना पार पाडणे. (१८.२अ).

(३) प्राधिकृत नगरपालिकेने मंजूर केलेल्या अर्थसंकल्पाला अनुसरून प्राथमिक शिक्षण निधीतून पैशाचे संवितरण करणे. (१८.२ब).

(४) मान्य प्राथमिक शाळा व मुलांचे राहण्याचे ठिकाण यामधील अंतर ठरविणे. (१३.२फ).

(५) परिषद शिक्षणाधिकाऱ्यांच्या संमतीने सुट्ट्यांची संख्या, मुदत व शिक्षणाचे तास ठरविणे. (१८.२ग).

(६) प्राथमिक शाळांची जागा निश्चित करणे. (१३.२इ).

(७) नमुने, लेखनसामग्री, फर्निचर किंवा इतर साधनसामग्री पुरविण्याबाबत निविदांना मंजुरी देणे. (१२.२ज).

(८) स्थानिक गरजांनुसार आवश्यक वाटतील असे फेरफार अभ्यासक्रमात करण्याविषयी संचालकास शिफारस करणे. (१२.२ल)

(९) संचालकाच्या मंजुरीने प्राथमिक शाळेचे दैनंदिन कामकाज ठरविणे.(१८.२)

नगरपालिका क्षेत्रातील प्राथमिक शिक्षणाबद्दलची योजना करणे, तिची अंमलबजावणी करणे इत्यादि विषयीची सर्व जबाबदारी शाळामंडळाने पार पाडावयाची आहे. शाळामंडळ हे लोकप्रतिनिधी मंडळ असून शाळा-मंडळाला सरकार व प्राधिकृत नगरपालिका यांचे सहकार्य मिळवून काम करावे लागते. प्राधिकृत नगरपालिका शाळामंडळाची पितृसंस्था ( Parent Body ) असून तिच्या मार्गदर्शनाखाली शाळामंडळाला काम करावे लागते.

४.५. <u>सरकार व स्थानिक नियंत्रक संस्था</u> :

प्राथमिक शिक्षणाचे नियंत्रण, प्रशासन, प्रशासनयंत्रणा अधिकाऱ्यांची कामे, अर्थविषयक व्यवस्था इत्यादी बाबींसंबंधी प्रायमरी एज्युकेशन अॅक्ट १९४७ च्या तरतुदींना अनुसरून १९४९ मध्ये मुंबई सरकारने मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ तयार केले आहेत. ह्या नियमाप्रमाणे प्राथमिक शिक्षणाचे प्रशासन चालू आहे. त्यांतील कांही महत्वाच्या तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत.- (कंसातील आकडे मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ च्या सरकारी प्रकाशनातील आहेत)

(१) प्राधिकृत नगरपालिकेच्या अध्यक्षाने शाळामंडळात निवडून आलेल्या सभासदांची नांवे शिक्षण संचालकास व जिल्हाधिकाऱ्यास कळवावी (७).

(२) शाळामंडळाची सभा बोलावण्यास टाळाटाळ होत असेल तर संचालक सभा बोलावू शकतो. (१५.२)

(३) मागासवर्गीय वा गरीब विद्यार्थ्यांना द्यावयाच्या सुविधांबाबत नगर-पालिकेने अंदाजपत्रकी तरतूद करावी लागते. (३५).

(४) नगरपालिकेतील शाळेमधील अप्रशिक्षित शिक्षकांला प्रशिक्षणासाठी पाठवावयाचे झाल्यास याबद्दलचा निर्णय सरकार घेते. (३७.४अ).

(५) कर्मचाऱ्याची सेवा उसनवार देणे किंवा हस्तांतरित करणे याबद्दलचा करार नगरपालिका व सरकार यांच्यामध्ये होतो. (४७).

(६) सरकार स्थानिक नियंत्रक संस्थांची चौकशी करू शकते. (४८.१).

(७) शाळामंडळाच्या बैठकीला सरकारने नियुक्त केलेला प्रतिनिधी हजर राहू शकतो. (४९).

(८) शाळामंडळाचा कोणताही आदेश रद्द करण्याचा किंवा अंमलबजावणी निलंबित करण्याचा अधिकार सरकारचा आहे. (५१).

(९) सक्तीची प्राथमिक शिक्षण योजना नगरपालिकांनी तयार करून तिला सरकारची मंजुरी घ्यावी लागते. (८४.२).

(१०) सरकारच्या पूर्वपरवानगीशिवाय नवीन प्राथमिक शाळा सुरू करता येत नाही, किंवा एखादी खाजगी प्राथमिक शाळा हाती घेता येत नाही किंवा चालू असलेल्या शाळांवर अतिरिक्त खर्च करता येत नाही. (१०४).

(११) खाजगी प्राथमिक शाळेला मान्यता द्यायची झाल्यास त्याबद्दलची चौकशी जिल्ह्याचा उप-निरीक्षक करतो. (१०७).

(१२) मान्य शाळेची मान्यता काढून घ्यावयाची झाल्यास शिक्षण उप-निरीक्षकाची शिफारस लागते. (१०९).

(१३) खाजगी शाळेला अनुदान हवे असेल तर खाजगी शाळांनी जिल्ह्याच्या उप-निरीक्षकाकडे अर्ज करावयाचा असतो. (११०). अनुदानाची रक्कम शिक्षण उप-निरीक्षकाच्या शिफारशीवरून ठरविली जाते (११२) किंवा बंद केली जाते. (१११).

(१४) मान्य शाळेतील मोठ्या सुट्यांचा कालावधी शिक्षण निरीक्षकाच्या मान्यतेने ठरवावा लागतो. (१२५.४).

(१५) सरकारच्या मान्यतेशिवाय व अनुदानासाठी मान्य असल्याशिवाय कोणताही खर्च करता येत नाही. (१४५).

(१६) सक्तीच्या प्राथमिक शिक्षण योजनेत समाविष्ट असलेल्या खर्चाकरिता अंदाजित खर्चाच्या निम्म्याइतकी रक्कम अनुदान म्हणून सरकारकडून मिळते. (१४८).

(१७) नगरपालिकेच्या अर्थसंकल्पात समाविष्ट नसलेली रक्कम खर्च केली तर अध्यक्षाने संचालकास कळविले पाहिजे. (१५६.२).

(१८) प्रत्येक वर्षाचा जमाखर्चाचा गोषवारा संचालकांकडे पाठवावा लागतो. (१६२).

नगरपालिकांना दिलेले अधिकार नगरपालिकांकडून योग्यरित्या वापरले जात आहेत की नाहीत हे पाहणे सरकारचे काम आहे. त्यासाठी सरकारने आपले हाती काही अधिकार ठेवणे रास्त आहे. वरील तरतुदी लक्षांत घेता असे दिसून येते कीं, सरकारने महत्वाचे अधिकार स्वत:कडे ठेवले आहेत. प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रातील नगरपालिकांचे अधिकार मर्यादित आहेत व प्रत्येक आर्थिक व प्रशासकीय बाबींवर सरकारचे नियंत्रण आहे.

४.६. नगरपालिका व शाळामंडळ : अधिकार

दि बॉम्बे प्रायमरी एज्युकेशन ॲक्ट १९४७ च्या कायद्याला अनुसरून इ.स.१९४९ मध्ये काही नियमावली तयार करण्यात आलेली आहे. त्या नियमावलीत नगरपालिका व शाळामंडळ यांचे अधिकार व संबंध स्पष्ट केले आहेत. त्यातील काही महत्वाच्या बाबी पुढीलप्रमाणे आहेत.- (कंसातील आकडे मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ मधील कलमांचे आहेत.)

(१) शाळामंडळाचे सभासद नगरपालिकेच्या सभासदांकडून निवडले जातात (६.२).

(२) नगरपालिकेचा अध्यक्ष शाळामंडळाची पहिली सभा बोलावतो. त्या

सभेचे अध्यक्षपद स्वीकारतो व शाळामंडळाच्या सभापती व उपसभापती यांची निवडणूक घेतो. (१०, ११).

(३) शाळामंडळाच्या सभापतीस राजिनामा द्यायचा झाल्यास तो त्याने नगरपालिका अध्यक्षाकडे दिला पाहिजे. (१४.१).

(४) शाळामंडळाच्या प्रत्येक सभेचे इतिवृत्त नगरपालिकेच्या अध्यक्षाकडे पाठविले पाहिजे. (१८.२). नगरपालिकेचे अध्यक्ष शाळामंडळाचे इतिवृत्त नगरपालिकेच्या सभेपुढे सादर करतात. (१८.२).

(५) नगरपालिकेच्या अंदाजपत्रकात तरतूद असेल तरच शाळामंडळाला नवी शाळा उघडता येते (२२) व मान्य शाळांना अनुदान देता येते (२४).

(६) शाळामंडळाने आवश्यक असलेल्या कर्मचा-यांची यादी करून नगरपालिकेकडे द्यावी. नगरपालिका तीत फेरबदल न करता किंवा फेरबदल करून मंजूर करते. (२६.२).

(७) नियमापेक्षा जादा शिक्षक लागल्यास जादा शिक्षक देणे ही जबाबदारी नगरपालिकेची आहे. (२७.२).

(८) प्राधिकृत नगरपालिका शाळामंडळाच्या शिफारशीवरून कर्मचा-यापैकी कोणासही पूर्वपदावर नेमते, पुन्हा सेवेत घेते किंवा सेवेच्या मुदतीत वाढ करते. (४१).

(९) शाळामंडळाला शाळेकरिता लागणारी इमारत, क्रीडांगण व इतर सामग्री नगरपालिका उपलब्ध करून देते. (४२).

(१०) प्राथमिक शाळांबद्दल नगरपालिकेने काढलेले आदेश शाळामंडळावर बंधनकारक असतात व ते शाळामंडळातर्फे पाठविले जातात. (४७).

(११) शाळामंडळाला रु.५,०००/- पेक्षा जास्त असलेली निविदा मंजूर करावयाची असल्यास नगरपालिकेची मंजुरी मिळविणे आवश्यक असते. (५९).

(१२) शाळामंडळाला सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना नगरपालिकेशी विचार-विनिमय करून तयार करावी लागते. (८४.२).

(१३) शाळामंडळाने अर्थसंकल्प तयार करून नगरपालिकेला सादर करावा. नगरपालिका आवश्यक वाटेल तर फेरफार करून वा फेरफार न करता अर्थसंकल्पास मान्यता देते. (१५४.२).

(१४) सरकारकडून किती अनुदान मिळणार आहे हे सरकार नगरपालिकेला कळवते. नगरपालिका तसे शाळामंडळाला कळवते व त्यानंतर शाळामंडळ दुरुस्त अंदाजपत्रक तयार करून नगरपालिकेला सादर करते व नगरपालिका त्यांत फेरफार करून वा फेरफार न करता मंजूर करते.(१५४.४)

वरील तरतुदींचा विचार केल्यास असे लक्षांत येते कीं, -

(१) नगरपालिकेच्या संदर्भात शाळामंडळाचे स्थान दुय्यम स्वरूपाचे आहे.

(२) शाळामंडळाचे दैनंदिन व्यवहार सोडले तर प्रत्येक बाबतीत शाळामंडळाला नगरपालिकेकडे विचारणा करावी लागते.

(३) शाळामंडळाला स्वत:चे अधिकार अगदी नाममात्र आहेत.

(४) शाळामंडळाच्या कामकाजावर नगरपालिकेच्या दृष्टिकोनाचा परिणाम होणे शक्य आहे.

नगरपालिकांवर प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी सोपविल्यावर जे निरनिराळे कायदे पास करण्यात आले त्यांची माहिती या प्रकरणात दिली आहे. 'दि प्रायमरी एज्युकेशन ॲक्ट ऑफ १९२३' ने शिक्षण खात्याचे अधिकार कमी करून स्थानिक संस्थांना अधिक अधिकार दिले व कांही प्रशासनात्मक प्रश्न निर्माण केले. 'दि बॉम्बे प्रायमरी एज्युकेशन (ॲमेंडमेंट)ॲक्ट १९३८' च्या कायद्याने शाळामंडळांचे अधिकार कमी केले व कांही आर्थिक प्रश्न निर्माण केले. त्यानंतर 'दि बॉम्बे प्रायमरी एज्युकेशन ॲक्ट, १९४७' कायदा अस्तित्वात आला. हा कायदा सध्या कार्यरत आहे. या कायद्यानुसार शासन नगरपालिकेला व शाळामंडळाला प्राथमिक शिक्षणाच्याबाबतीत मार्गदर्शन करते व

प्राथमिक शिक्षणाबद्दलची आर्थिक जबाबदारी मोठ्या प्रमाणात उचलते. शाळा-
मंडळ दैनंदिन कामासाठी स्वतंत्र आहे. पण आर्थिक क्षेत्रात नगरपालिका व
शासन यावर अवलंबून आहे. नगरपालिका व शाळामंडळांचे संबंध जवळचे आहेत.

# संदर्भ


1. M.R.Shah, Local Authorities and Education in Administration of Education in India, edited by S.N.Mukherjee, Acharya Book Depot, Baroda, 1962, p.104.

2. Government of Bombay, A Review of Education in Bombay State 1855-1955, Poona, 1956, p.81.

3. ग.ब. जोशी, महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक प्रशासन, ज्योती प्रकाशन, पुणे, १९६१. पान ५४.

4. Government of Bombay, A Review of Education in Bombay State 1855-1955, Poona, 1956, p.12.

5. Ibid., p.80.

6. ग.ब.जोशी, महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक प्रशासन, ज्योती प्रकाशन, पुणे, १९६१, पान ५४.

7. Government of Bombay, A Review of Education in Bombay State 1855-1955, Poona, 1956, p.72.

8. ग.ब.जोशी, महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक प्रशासन, ज्योती प्रकाशन, पुणे, १९६१, पान ५४.

9. Ibid., p.65.

10. Ibid., p.56.

11. Government of Bombay, A Review of Education in Bombay State, 1855-1955, Poona, 1956, p.83.

12. ग.ब.जोशी, महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक प्रशासन, ज्योती प्रकाशन, पुणे, १९६१, पान ५७.

13. M.R.Shah, Local Authorities and Education, in Administration of Education in India, edited by S.N.Mukherjee, Acharya Book Depot, Baroda, 1962, p.108.

14. ग.वश्र जोशी, <u>महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक प्रशासन</u>, ज्योती प्रकाशन, पुणे, १९६१, पान ६५.

15. Government of Bombay, <u>A Review of Education in Bombay State, 1855-1955,</u> Poona, 1956, p.89

16. M.R.Shah, <u>Local Authorities and Education in Administration of Education in India</u>, edited by S.N. Mukherjee, Acharya Book Depot, Baroda, 1962, p.107.

17. Ibid., p. 101.

18. Ibid., p.107.

19. Ibid., p.112.

20. शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, <u>मुंबई प्राथमिक शिक्षण नियम, १९४९</u>, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, १९८४, पान ८४.

21. Law and Judiciary Department, Government of Maharashtra, <u>The Bombay Primary Education Act, 1947</u>, Government Central Press, Bombay, 1960, Clause No.4.

22. Ibid., Clause No.21.

23. Ibid., Clause No.20.

24. Ibid., Clause No.23.

25. Ibid., Clause No.24.

26. Ibid., Clause No.49.

9[illegible]93
A.